समाजसेवक

# नामदार गोखले

[redacted]
विषय
दा. क्र.



BVBK-0402946

सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.

बा.वा.
२९०६
३।३।९८

● संस्कारक्षम चरित्रमालिका ●

# समाजसेवक

# नामदार गोखले

२९४६ ३।३।९७
बा.वा.



लेखक

श्री. शं. रा. देवळे

BVBK-0402946

मे. सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.

: प्रकाशक व मुद्रक :
प्रकाश य. कुंदूर
मे. श्रीराम ऑफसेट
क्वालिटी प्रिंटर्स आणि पब्लिशर्स
सर्व्हे नं. १४/२३ 'गायत्री', मु. पो.धायरी.
ता. हवेली, पुणे ४१.

: प्रमुख विक्रेते :
मे. सरस्वती ग्रंथ भांडार
अप्पा बळवंत चौक,
पुणे, ४११ ००२
मे. सरस्वती बुक डेपो
नवी पेठ, सोलापूर ७.

: लेखक :
शं. रा. देवळे

आवृत्ती १९९४ किंमत १० रुपये

© सर्व हक्क प्रकाशकांकडे

"सध्या आपणास आपल्या देशासाठी अनेक बाजूंनी अहर्निश झटले पाहिजे. उज्ज्वल देशभक्तीने प्रेरित होऊन जर आपण आपल्या देशास सर्वांगसुंदर बनविण्यासाठी झटू तर हल्लीची लाजिरवाणी स्थिती फार दिवस टिकावयाची नाही, हे उघड आहे.

आज जिकडे नजर फेकावी तिकडे कामाचा डोंगर पडलेला आहे. तो उचलण्यास हजारो सुशिक्षितांनी आपले जन्म खर्ची घातले पाहिजेत. आपणांवर प्रचंड जबाबदारी आहे असे वाटून त्यांचे स्फूरण आले पाहिजे. जो क्षण देशकार्याशिवाय इतर उद्योगात गेला तो फुकट गेला. अशी मनास तळमळ लागली पाहिजे. ज्यांचे चित्त देशमय झाले त्यास ईश्वर मातृभूमीचा उद्धारक बनविल्याशिवाय राहावयाचा नाही."

# ✣ अनुक्रमणिका ✣


| | | |
|---|---|---|
| १. | कृष्ण आणि सत्यभामा | ५ |
| २. | गोविंद आणि गोपाळ | ६ |
| ३. | शिक्षण आणि संसार | ८ |
| ४. | दीर आणि भावजय | १० |
| ५. | जहाल आणि मवाळ | १२ |
| ६. | गुरु आणि शिष्य | १४ |
| ७. | भाषणे आणि कार्य | १६ |
| ८. | देश आणि परदेश | १६ |
| ९. | गोखले आणि गांधीजी | २० |
| १०. | राष्ट्रकार्यासाठी प्रवास | २२ |
| ११. | ना. गोखले यांचे निधन | २३ |
| १२. | हे महाराष्ट्रीय अंतःकरणातून सर्व एक आहेत | २४ |
| १३. | यातच खरे मोठेपण आहे | २५ |
| १४. | त्यांचा फोटो टेबलावर ठवण्यात लाज कसली ? | २६ |
| १५. | माझ्या गुरूंचे उपरणे | २६ |
| १६. | तुम्हांला हे पुढे कळेल . | २७ |
| १७. | गोखले यांचे जीवन कार्य | २८ |
| १८. | भारतसेवक समाज | २९ |
| १९. | नामदार गोखले यांची वचने | ३१ |
| २०. | ना. गोखले यांचे अंकगणित | ३२ |
| २१. | ना. गोखले यांच्याबद्दल थोरांचे बोल | ३२ |
| २२. | ना. गोखले यांचा जीवनपट | ३२ |

# १. कृष्ण आणि सत्यभामा

पश्चिमसागराच्या पूर्वतटावरील रत्नागिरी जिल्हा म्हणजे जणू रत्नांचे आगर. तेथील गुहागर भागातील वेळणेश्वर गावचे गोखले घराणे. या गोखल्यांपैकी ताम्हणमळ्याचे मूळ पुरुष बाळाजी गोखले, मोठे कष्टाळू, मेहनती आणि मानी पुरुष. त्यांच्या घराण्यात कृष्णरावांचा जन्म झाला. हे कृष्णराव लहानपणी अत्यंत धाडशी होते, म्हणून त्यांना सारे लोक वाघोबा म्हणत.

चिपळूणजवळच्या कोतळूक गावचे भास्करपंत ओक यांनी आपली मुलगी वालूबाई ही वाघोबा म्हणजे कृष्णराव यांना दिली. तीच वालूबाई सासरी 'सत्यभामा' बनली. ही कृष्ण आणि सत्यभामा यांची जोडी सर्वांना आवडली.

घरच्या गरीबीमुळे कृष्णरावांना शिक्षण सोडून संसार चालविण्यासाठी कागल येथे कारकुनाची नोकरी करावी लागली. बढती होत होत हे वाघोबा कृष्णराव लौकरच फौजदारीच्या हुद्यावर काम करू लागले.

सत्यभामा ही अत्यंत साधी स्त्री होती. देवाची भक्ती करून अतिथींचे स्वागत करण्यात ती तत्पर होती. तिची पतिनिष्ठा अत्यंत जाज्वल्य होती. तिच्या संसारात शांतता, सुख आणि समाधान नांदत होते. तिचा संसार गरीबीचा पण अगदी नीटनेटका होता. तिच्या सहवासात कृष्णराव सतत संतुष्ट असत.

कृष्ण आणि सत्यभामा या जोडप्याला गोविंद आणि गोपाळ या दोन पुत्ररत्नांचा लाभ झाला दिनांक ९ मे १८६६ रोजी कोतळूक या गावी गोपाळचा जन्म झाला. हाच गोपाळ मोठेपणी भारताचा एक महापुरुष म्हणून प्रसिद्धीला आला.

गोविंद आणि गोपाळ या दोन्ही मुलांचे शिक्षण कागल येथे चालले होते. त्यांच्या शिक्षणासाठी कृष्णरावांनी खर्चाची मुळीच हयगय केली नाही. शालेय शिक्षणाबरोबरच घरगुती शिक्षणही त्यांना देण्यासाठी कृष्ण आणि सत्यभामा ही मातापिता प्रयत्न करीत. आपल्या मुलांची हुशारी आणि चांगली वागणूक पाहून त्यांना संसाराचे सार्थक झाल्यासारखे वाटे. ते आपल्या मुलांचे भारी कौतुक करीत.

गोविंद आणि गोपाळ यांचे मराठी शिक्षण कागल येथे झाले. नंतर हे दोघे बंधू इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी कोल्हापूर येथे गेले. आपली दोन्ही मुले इंग्रजी शिकून मोठ्या नावलौकिकास चढावीत, अशी इच्छा कृष्ण आणि सत्यभामा यांची होती. त्यामुळेच त्यांनी आपल्या प्रियपुत्रांचा वियोग सहन केला.

गोपाळ तेरा वर्षे वयाचा झाला. त्याचे इंग्रजी शिक्षण खूपच जोरात चालले होते. त्याची पाठान्तरशक्ती फार दांडगी होती. त्याच्या हुशारीचे कौतुक गुरुजन आणि सारे विद्यार्थी करीत. आपल्या मुलाची ही कीर्ती ऐकून कृष्णराव आणि सत्यभामाबाई यांना आनंद होई.

पण या आनंदाचा उपभोग कृष्णरावांना फार काळ घेता आला नाही. काळाने त्यांना अकस्मात इहलोकातून ओढून नेले. इ. स. १८७९ साली सत्यभामाबाईंवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. कृष्णराव मरण पावले. या भयंकर दुःखाने गोविंद आणि गोपाळ या मुलांचा

ती सोडवून घेतली आहेत. मी हुशार नाही. माझी ही लबाडी झाली आहे. मला क्षमा करा.'' गोपाळचा खरेपणा ऐकून सर्वांना त्याचे कौतुक वाटले.

अशा सत्यप्रिय, हुशार आणि बाणेदार भावाचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी गोविंदाने स्वतःच्या शिक्षणावर पाणी सोडले आणि तो पंधरा रुपये दरमहा मिळविण्यासाठी कारकुनाची नोकरी करू लागला. आपल्याला मिळणाऱ्या पगारातून अर्धे पैसे तो दरमहा नियमितपणे गोपाळला पाठवू लागला. भावाच्या सुखात तो आपले सुख पाहू लागला.

''भाऊ असावा तर गोविंदासारखा!'' असे म्हणून गोपाळही आपले शिक्षण नेटाने चालवू लागला. त्याने पाठविलेल्या पैशांचा गोपाळने कधीच दुरुपयोग केला नाही. आपला भाऊ गोविंद किती प्रेमळ आहे, किती त्यागी आहे, किती थोर मनाचा आहे याची पुरेपूर जाणीव गोपाळला होती.

गोविंद आणि गोपाळ या दोन भावांचे हे प्रेम पाहून त्यांची आई सत्यभामाबाई आणि चुलते अंताजीपंत यांना खूपच आनंद होई. ती दोघेही ह्या गुणी मुलांना मनोमन आशीर्वाद देत आणि मोठेपणी हे दोघेही मोठ्या नावलौकिकाला चढोत, अशी देवाजवळ नम्र प्रार्थना करीत. स्वर्गीय पिता कृष्णराव यांच्या कृपाछत्राची सावली या दोघांवर खात्रीने होतीच!

❐ ❐ ❐

## ३. शिक्षण आणि संसार

गोविंदाचे लग्न झाले आणि गोपाळचेही लग्न करावे, असा विचार सुरू झाला, त्या वेळी कृष्णराव म्हणाले,''त्याच्या लग्नाची घाई नको. त्याला खूप शिकू द्या आधी!'' पण कृष्णराव वारल्यानंतर लगेच एका वर्षातच म्हणजे इ.स. १८८० साली गोपाळचा विवाह करण्यात आला. हा विवाह स्वतः गोपाळला आवडला नाही. पण घरातील सर्व वडील मंडळींपुढे त्याचा नाइलाज झाला.

गोपाळची बायको सावित्री, एवढीशी पोर! तिला संसाराचे काय कळणार, पण तिला एवढे मात्र कळत होते की, आपला पती शहराच्या शाळेत इंग्रजी शिकत आहे. त्याच्या शिक्षणासाठी गोविंदभावोजी दरमहा पैसे पाठवीत असतात. त्या पैशांचा हिशोब तिकडून अगदी नीटनेटका येतो आणि तो हिशोब पाहून भावोजी म्हणत असतात, ''वाहवा! माझा गोपाळ किती शहाणा आहे. काटकसरीने वागून हाल सोसतो. पै न् पै अगदी योग्य कामात खर्च करतो. माझ्या कष्टाचे चीज होणार! गोपाळ फार मोठा पुरुष होणार! तो आपल्या घराण्याची कीर्ती वाढविणार!''

गोविंदरावांचे हे शब्द ऐकून सावित्रीला खूपच आनंद होई. ती मनातल्या मनात आपल्या भावी संसाराची सुखस्वप्ने रंगविण्यात गुंग होई. पतीला जरी ती आवडत नव्हती तरी तिला मात्र आपला पती खूप आवडे. ती त्याच्या सुटीच्या दिवसांत घरी येण्याची वाट पाहात असे.

सुटीत गोपाळराव घरी आले तरी ते मात्र सावित्रीकडे पाहात नसत. ते तिच्याशी बोलतही

नसत. कारण एकतर हा विवाह त्यांच्या मनाविरुद्ध झालेला होता आणि तशातच सावित्रीला पंडुरोग झाल्याचे त्यांना कळले होते. त्यामुळे त्यांनी सावित्रीचे नावच टाकले होते. बिचारी सावित्री तशाही स्थितीत आनंदाने राहात होती!


गोविंदराव पाठवीत असलेल्या दरमहाच्या आठ रुपयांत गोपाळ आपले जेवण आणि शिक्षण खर्च अगदी काटकसरीने भागवीत असे.

गोपाळ अगदी साधाभोळा, पण अत्यंत हुशार आणि सरळमार्गी विद्यार्थी होता. त्याच्या पाठान्तरामुळे त्याचे सोबती त्याला, "घोक्या गोपाळ" किंवा "पाठ्या गोपाळ" म्हणून चिडवीत असत, तरीही त्याचे त्याला काहीच वाटत नसे. तो चिडतही नसे किंवा फुगूनही जात नसे.

दरमहा चार रुपये देऊन गोपाळ एका साध्या खानावळीत जेवत असे. एके दिवशी त्याच्याशेजारी बसलेल्या इसमास वाढप्याने दही वाढले, त्यावेळी गोपाळलाही दही खाण्याची इच्छा झाली. वाढप्याला तो म्हणाला, "अहो मलाही थोडे दही वाढा हो!"

वाढपी म्हणाला, "तुला रे कसले दही? तू दरमहा चार रुपड्या देणारा! दही खायला साडेचार रुपये भरावे लागतात!"

"मी आजपासून साडेचार रुपये देत जाईन, पण मला दही वाढा!" असे म्हणून गोपाळने हट्टाने दही घेतले, पण आता ती आठ आण्यांची वाढ कशी भरून काढावी याची काळजी त्याला लागली. मग त्याने आठवड्यात एक दिवस संपूर्ण उपवास धरला आणि त्या दिवसाचा खाडा करून त्याने ते आठ आणे वाचविले.



शिक्षण-खर्च भागविण्यासाठी काटकसरी गोपाळने मॅट्रिकचा अभ्यास रस्त्यावरील दिव्याखाली केला.

गोपाळ गरीबीत राहात होता तरीही तो अत्यंत स्वाभिमानी होता. गरीबीचा त्रास तो आनंदाने सोशीत होता. मिळत असलेल्या थोड्यापैशात तो स्वाभिमानाने जगत होता. त्याने पैशासाठी कोणाजवळही कधीच याचना केली नाही किंवा उधार-उसनवार केले नाही.

एकदा त्याचा मित्र म्हणाला, ''गोपाळ, चल आपण नाटकाला जाऊ! आजचे नाटक फारच सुंदर आहे. तुझ्या तिकिटाचे पैसे मी भरतो चल जाऊ या!''

मित्राच्या आग्रहामुळे त्या दिवशी गोपाळ बळेच त्या नाटकाला गेला. पण पुढे चार आठ दिवसांनी मित्राने गोपाळजवळ तिकिटाचे आठ आणे मागितले तेव्हा गोपाळला मोठीच पंचाईत पडली. गोपाळने त्याला चटकन ते आठ आणे गुपचूप देऊन टाकले.

या आठ आण्यांची भर काढण्यासाठी गोपाळने मग एक युक्ती केली. त्याने आपल्या खोलीतील दिवा बंद ठेवला आणि तो नगरपालिकेच्या रस्त्यावरील दिव्याखाली जाऊन दररोज अभ्यास करू लागला.

अशा प्रकारे हाल सोशीत त्याने आपला अभ्यास चालू ठेवला. इ.स. १८८१ च्या डिसेंबरात मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि त्या परीक्षेत गोपाळ उत्तीर्ण झाल्याचे सर्वांना कळाले. तो निकाल ऐकून गोपाळला तर आनंद झालाच, पण घरातील सर्व मंडळींना आपल्या कष्टाचे सार्थक झाल्याचे संपूर्ण समाधान मिळाले. सावित्रीतर हर्षाने फुलून गेली. ❑❑❑


## ४. दीर आणि भावजय

अवघ्या पंधराव्या वर्षी गोपाळराव मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्या वेळी सर्वात जास्त आनंद जर कोणास झाला असेल तर तो त्यांच्या भावजय रमाबाईंना. रमाबाई ह्या गोविंदरावांच्या पत्नी होत. परीक्षा पास झाल्याचा पहिला पेढा गोपाळरावांनी प्रथम आपल्या वहिनींच्या हातात देऊन त्यांच्या चरणी मस्तक ठेवले आणि कृतज्ञतेच्या अश्रूंनी त्यांचे पाय भिजविले.

रमाबाई होत्याच तशा गोड. त्या अत्यंत प्रेमळ, उदार आणि त्यागी होत्या. आपल्या दिराचे ते इंग्रजी शिक्षण चालू ठेवण्यासाठी त्या आपल्या संसाराच्या खर्चात खूपच काटकसर करीत. दरमहा ठराविक पैसे गोविंदरावांकडून गोपाळराव भाऊजींना पाठविण्याची त्या काळजी' घेत. त्यांच्याविषयी गोपाळला अत्यंत आदर वाटे. मातेप्रमाणे त्यांना ते मानीत असत!

मॅट्रिकनंतर गोपाळराव कोल्हापुरास राजाराम कॉलेजात दाखल झाले. त्यांच्या कॉलेजखर्चासाठी त्या माऊलीने आपल्या जवळील किडूकमिडूक विकले आणि दिराच्या कॉलेजखर्चाची सोय केली.

कॉलेजच्या दुसऱ्या वर्षासाठी गोपाळला पुण्यास जावे लागले, पण तेवढ्यात कोल्हापुरासच पुनः सोय झाल्यामुळे ते कोल्हापुरला आले. नंतर पुढील वर्षासाठी त्यांना



गोपाळच्या शिक्षणासाठी स्वतःचे दागिने विकणारी त्याची वहिनी रमाबाई.

मुंबईला सोय करावी लागली. या सगळ्या खटाटोपामुळे गोविंदरावांना खूपच खर्च करावा लागला.

आपल्या तुटपुंज्या पगारात संसारखर्चासह गोपाळच्या कॉलेजशिक्षणाचा खर्च गोविंदरावांना डोईजड वाटू लागला. एकदा ते त्रासून गोपाळला म्हणाले,'' झाले एवढे पुरे झाले तुझे शिक्षण! आता तू एखादी नोकरी धर. तुझे इंग्रजी चांगले आहे. तुला आता चांगली नोकरी मिळेल. घरखर्चाला आता तुझ्या मिळकतीची भर पाहिजे! यापुढे शिक्षण बंद!!''

आपल्या पतीच्या या बोलण्याचा रमाबाईंना खूपच राग आला. त्या गोपाळरावांना एकदम म्हणाल्या,'' काही नको नोकरी! भाऊजी तुम्ही आपले शिक्षण चालूच ठेवा. खूप खूप शिका. खूप मोठे व्हा! तुमच्या शिक्षणखर्चासाठी मी माझे दागिने विकून टाकीन. इकडचे काही ऐकू नका! त्राग्याचे शब्द मनावर धरू नका!''

आणि खरोखरच त्या थोर भावजयीने आपल्या दिराच्या शिक्षणासाठी आपल्या अंगावरील सारे अलंकार विकून टाकले. ती लंकेची पार्वती बनली. तिच्या या त्यागाला तोड नाही. आपल्या कातडीचे जोडे करून तिच्या पायांत घातले तरी तिचे उपकार फिटणार नाहीत,'' असे गोपाळरावांना वाटले.

इ.स. १८८४ मध्ये गणित हा ऐच्छिक विषय घेऊन मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजातून गोपाळराव द्वितीय श्रेणीत बी.ए. ची परीक्षा पास झाले. या आपल्या गरीब, सालस आणि हुशार मित्राचे यश पाहून धोंडोपंत कर्वे यांना खूपच आनंद झाला. त्यांनी त्याला शाबासकी दिली.

''माझ्या वहिनींच्या पुण्याईमुळेच मला हे

यश मिळाले," असे गोपाळराव मोठ्या अभिमानाने सांगत. बी. ए. नंतर पुढे काय? एंजिनियर व्हावे की वकील बनावे, अशा द्विधावृत्तीने गोपाळरावांनी दोन्ही प्रकारचा थोडा थोडा अभ्यास सुरू केला, पण घरच्या परिस्थितीमुळे त्यांनी तो नाद सोडला आणि विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी धरली.

पुण्याच्या शनिवार पेठेतील तांबे यांच्या मोठ्या वाड्यात गोपाळरावांनी बिऱ्हाड केले. त्याच वाड्यात टिळक आणि आगरकरही राहत होते. त्यांच्या थोर देशकार्याबद्दल गोपाळरावांना विशेष आदर वाटे.

टिळक-आगरकरांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक नवीन कॉलेज सुरू केले, त्या कॉलेजमध्ये त्या सोसायटीचे एक आजीव सभासद म्हणून गोपाळरावांनी अल्पपगारात प्राध्यापकाचे काम करावे, असा आग्रह त्या मंडळींनी केला.

इंग्रजी शिक्षणाच्या जोरावर लठ्ठपगाराची नोकरी करून आपल्या वहिनींना अलंकारांनी मढवावे, अशी एक इच्छा गोपाळरावांना होती, पण टिळक-आगरकरांच्या या संस्थेत अल्पपगार घेऊन थोर देशकार्य करावे, अशीही त्यांना प्रबळ इच्छा झाली.

हे सारे विचार त्यांनी आपल्या अण्णांना आणि वहिनींना कळविले. गोविंदरावांनी त पत्रानेच परवानगी दिली. आणि रमावहिनं आपल्या दिरास म्हणाल्या,"भाऊजी, टिळक आगरकरांसारख्या थोर लोकांच्या बरोबरीने तुम्हं बसणार, याचे मला भूषण आहे! तुमचा मान हाच माझा खरा दागिना!". ❑❑❑

## ५. जहाल आणि मवाळ

गोपाळरावांनी संपत्तीचा मोह टाळला आणि देशकार्यासाठी स्वतःचे जीवन वाहून घेण्याचे ठरविले. त्या कार्यात येणाऱ्या विपत्तींचा त्यांनी आनंदाने स्वीकार केला. ते टिळक-आगरकरांप्रमाणेच देशसेवेचे कार्य खऱ्या निष्ठेने अहोरात्र करू लागले.

गोपाळरावांनी आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित केले त्याप्रमाणे त्यांची वाटचालही सुरू झाली. बाहेरील वातावरणात ते रमून, जात पण घरात मात्र ते सतत अस्वस्थ असत. त्यांची पत्नी सावित्री हिची प्रकृती नीट नसल्यामुळे त्यांना संसारसुख नव्हते.

गोपाळरावांची ही स्थिती जाणून त्यांची वहिनी रमाबाई यांनी त्यांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह केला. इ.स. १८८७ मध्ये गोपाळरावांचे दुसरे लग्न झाले. यावेळी वहिनींना शंका होती की, आपले भाऊजी तापट, हट्टी आणि संतापी स्वभावाचे आहेत त्यामुळे या लग्नात काही विघ्न येते की काय! पण तसे काहीही झाले नाही. वहिनींनी आज्ञा केली आणि भाऊजींनी दुसरी बायको केली. ते नव्या संसारात रमून गेले.

या वेळी महाराष्ट्रातील जनतेला टिळकांच्या 'केसरी' ने जाग आणली होती. स्वराज्य मिळाल्याशिवाय देशातील लोकांना खरे

सुख मिळणार नाही. आणि ते स्वराज्य मिळविण्यासाठी सामान्य लोकांसह सर्वांनी एकजूट करून परकीय सरकारशी झगडले



लोकमान्य टिळक

पाहिजे. आपले हक्क आपणच मिळविले पाहिजेत, त्यासाठी सरकारचे नाक दाबल्याशिवाय त्याचे तोंड उघडणार नाही. अशा प्रकारची जहाल विचारसरणी टिळकांची होती. त्यादृष्टीने त्यांचे प्रयत्न चालू होते आणि आपले विचार ते 'केसरी' वर्तमानपत्रातून सर्व लोकांपर्यंत पोहोचवीत होते.

केसरीची गर्जना सर्व लोकांना पसंत होती. टिळकांचे विचार सर्व लोकांना मान्य होते, परंतु काही सुशिक्षित लोकांना मात्र त्यांचा हा जहालपणा खपत नसे. त्या आंग्लविद्याविभूषित लोकांना वाटे की, सरकारशी झगडा न करता हळूहळू सनदशीरपणे आपण आपले हक्क सरकारकडून मिळवून घेऊ या. अर्जविनंत्यांचा राजमार्ग त्यांना पसंत होता.

टिळकांचे मित्र आगरकर म्हणत, ''स्वराज्य मिळवायचे हे खरे, पण ते चालविण्याची कुवत अगोदर आपल्या सर्व लोकांच्या अंगी आली पाहिजे. त्यासाठी आधी आपल्या समाजाची सुधारणा झाली पाहिजे. स्वराज्यप्राप्तीसाठी केवळ राजकीय खळबळ माजविण्यापेक्षा समाजसुधारणेची चळवळ आपण केली पाहिजे!''

टिळक आणि आगरकर यांच्या अशा प्रकारच्या आधी राजकीय की आधी सामाजिक या प्रश्नांवरच्या मतभेदांमुळे साहजिकच त्यांच्या मित्रमंडळींत दोन पक्ष पडले. ते दोन्ही पक्ष वास्तविक एकमेकांना पूरकच होते, तथापि मतभिन्नतेमुळे प्रत्येक पक्षाने आपआपला सवतासुभा उभा केला.



श्री. आगरकर

गोपाळराव गोखले यांना प्रथम प्रथम टिळकांची मते पसंत होती. त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी त्यांनी विद्यार्थिदशेत असतानाही प्रयत्न केले होते. कॉलेजात असताना त्यांनी केसरी फंडासाठी एक नाटक करून त्यात स्त्रीची-गोसाविणीची भूमिका केली होती.

टिळकांची जहाल मते म्हणजे ब्रिटिश सरकारविरोधी एक प्रकारचे बंडच आहे, त्यापेक्षा थंडपणाने सनदशीर चळवळींच्या मार्गाने आणि बौद्धिक वादविवादाने स्वराज्यप्राप्ती करण्याचा दुसरा पक्षच पुढे पुढे गोपाळरावांना पसंत पडला आणि मग ते आगरकरांच्या समाजसुधारणेच्या मार्गाकडे वळले. त्यांनी केसरी व मराठा या टिळकांच्या वृत्तपत्रांत लिहिणे सोडले आणि



न्या. रानडे

आगरकरांच्या "सुधारक" या वृत्तपत्रात लेखन सुरू केले.

केसरी आणि सुधारक या नियतकालिकां-मधील वादविवाद मोठ्या हिरीरीने लोक वाचीत. लोकमताचा काटा वारंवार झुकता ठेवण्याची किमया या दोन्ही पत्रांच्या लेखकांजवळ विशेष होती.

स्वतःचा संसार, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कार्य आणि व्याप या गोष्टी सांभाळून गोपाळराव गोखले आगरकरांच्या मवाळ पक्षात विशेष चमकू लागले. त्यानंतर सोसायटीमधून टिळक बाहेर पडले, तरीही त्यांची उणीव गोखले यांनी सोसायटीला जाणवू दिली नाही.

❒ ❒ ❒

## ६. गुरू आणि शिष्य

इ.स. १८८५ सालातील गोष्ट. पुणे येथे हिराबागेत एक सभा भरली होती. त्या सभेसाठी फक्त निमंत्रितांनाच प्रवेश होता. निमंत्रणपत्रिका दारावरच दाखवायची, नंतर सभागृहात जायचे, असे ठरले होते.

निमंत्रणपत्रिका पाहून त्या सभासदांना आत सोडण्याचे काम गोपाळराव गोखल्यांकडे दिले होते. स्वयंसेवक म्हणून दारावर ते काम करीत गोपाळराव उभे होते.




श्री. गोखले

थोड्या वेळाने मोठ्या पगडीचे एक भारदस्त गृहस्थ दाराजवळ आले. स्वयंसेवक गोपाळरावांनी त्यांना त्यांची निमंत्रणपत्रिका मागितली, पण त्या गृहस्थाजवळ ती नव्हती, म्हणून गोपाळराव नम्रपणाने त्यांना म्हणाले, "महाराज, आपणाला आत जाता येणार नाही."

गोखल्यांचे ते शब्द ऐकून तो गृहस्थ शांतपणाने तेथेच थबकून उभा राहिला. या स्वयंसेवकाच्या त्या शिस्तप्रियतेबद्दल त्या गृहस्थांना आदर वाटला. तो गृहस्थ गालात हसत त्या स्वयंसेवकाकडे पाहात उभा राहिला.

नंतर सभेचे व्यवस्थापक आतून धावत आले. त्यांनी त्या थोर गृहस्थास नमस्कार केला आणि त्यांना मोठ्या सन्मानाने सभागृहात नेले.

तो प्रकार पाहून गोपाळराव आ करून उभे राहिले. त्यांनी चौकशी केली तेव्हा त्यांना कळून आले की, हे थोर गृहस्थ म्हणजे न्यायमूर्ती रानडे होते.



शिस्तप्रिय स्वयंसेवक गोपाळने न्या. रानडेंना दारातच अडविले.

न्या. रानड्यांनीही चौकशी केली तेव्हा त्यांना कळून आले की, हा शिस्तप्रिय, तेजस्वी स्वयंसेवक म्हणजे गोपाळराव गोखले होते. गुरूशिष्यांची पहिली भेट ही अशी झाली.

सरकारी नोकरीत राहूनही देशसेवा कशी करता येते, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे न्यायमूर्ती रानडे हे होत. त्यांनी लोककल्याण साधणाऱ्या अनेक संस्था स्थापन केल्या. अनेक तरुणांना मार्गदर्शन केले. राजकारण करणाऱ्या अनेक लोकसंस्थांशी त्यांनी संबंध जोडले. अशा संस्थांपैकी पुण्याची सार्वजनिक सभा ही न्या. रानड्याची एक आदर्श संस्था होती.

या संस्थेत काम करण्यासाठी हुशार गोपाळरावांना न्यायमूर्ती रानड्यांनी मुद्दाम घेतले. त्यांनी गोपाळरावांना राजकारणाचे धडे दिले. अनेक प्रकारे मार्गदर्शन केले.

सतत परिश्रम घेऊन, निष्ठापूर्वक आणि चिकाटीने काम करणारे गोपाळराव गोखले हा आपला उत्तम शिष्य आहे, असे रानडे म्हणत. असा शिष्य मिळवून दिल्याबद्दल ते गोपाळराव आगरकरांचे नेहमी आभार मानीत.

न्या. रानडे यांच्यासारखा थोर गुरू आपणाला लाभला, याचा अभिमान गोपाळराव गोखल्यांना वाटे. ते म्हणत, ‘‘आगरकरांच्या कृपेने हा महापुरुष मला गुरू म्हणून लाभला. या गुरुचरणांजवळ बारा वर्षे आदराने आणि नम्रपणाने बसण्याचे भाग्य मला लाभले!’’

न्या. रानडे रोज पहाटे चार वाजता उठून संत तुकारामांचे अभंग गात असत. ते ऐकून एकदा गोखले म्हणाले,‘‘ रानडे यांच्यासारख्या शांतिब्रह्म साधूच्या जवळ असल्यावर मुखातून हीन विचार बाहेर कसे पडणार? किंबहुना

कोणाच्याही मनात ते हीन विचार येणारही नाहीत!"

पुणे सार्वजनिक सभेच्या कामांची सर्व जबाबदारी रानड्यांनी गोखल्यांवर संपूर्ण विश्वासाने टाकली, आणि त्या शिष्यानेही तीयथायोग्य पार पाडली. रानडे व गोखले ही राजकारणी गुरुशिष्यांची जोडी सर्वांना आवडली.

## ७. भाषणे आणि कार्य

अतिशय बुद्धिमान, सतत दीर्घोद्योगी, अभ्यासू, नीतिमान आणि राष्ट्राच्या कल्याणाचा हव्यास अहोरात्र असणारा असा थोर गुरू आपणास लाभला म्हणून गोपाळराव गोखले न्या. रानड्यांची वारंवार वाहवा करीत. त्यांना ते आपले श्रेष्ठ श्रद्धास्थान मानीत.

अत्यंत गुणी, परिस्थितीवर मात करून कार्यसिद्धी करण्यासाठी धडपडणारा, हुशार आणि प्रामाणिक असा तरुण, होतकरू शिष्य आपणास लाभला याबद्दल न्या. रानड्यांनाही अभिमान वाटे. या शिष्याचा रानड्यांनी राष्ट्रीयसभेत प्रवेश करून दिला आणि सनदशीर पद्धतीच्या राजकारणाचे पाठ त्यांनी गोखल्यांना पद्धतशीर दिले.

इ.स. १८९० साली कलकत्ता येथे भरलेले राष्ट्रीयसभेचे अधिवेशन गोखल्यांच्या पहिल्याच भाषणाने विशेष गाजले. अवघ्या चोवीस वर्षे वयाच्या तरुणाचे ते अत्यंत मुद्देसूद भाषण ऐकून मोठमोठ्या लोकांनीही तोंडात बोट घातले. गोपाळराव गोखले हे लवकरच जागतिक कीर्तीचे पुढारी होणार, असे सर्वांना वाटले.

आपला मुलगा गोपाळ याची मोठमोठ्या सभांतील भाषणे आणि त्याचे देशसेवेचे कार्य याबद्दल थोरथोर लोक त्याचा गौरव करतात, हे पाहून सत्यभामाबाईंना अतिशय आनंद वाटे. त्या मनात म्हणत, "माझे कार्य संपले. मी धन्य झाले!"

भाटवडेकर यांच्या वाड्यात इ.स. १८९३ मध्ये सत्यभामाबाईंनी आपला देह ठेवला. गोपाळरावांचा गौरव सांगण्यासाठी त्या स्वर्गात कृष्णरावांकडे गेल्या. मातेच्या वियोगाचे दुःख गोपाळरावांना अत्यंत झाले. त्या वारल्या त्या खोलीत ते दररोज जाऊन दंडवत घालीत. आईने जपून ठेवलेले वडिलांचे धोतर ही त्यांनी नीट सांभाळून ठेवले. त्या पवित्र स्मृतीस ते आदराने रोज वंदन करीत. गोपाळरावांची भाषणे आणि कार्य यांना त्यांच्या स्वर्गीय मातापित्यांचा आशीर्वाद लाभत असे.

आई वारली त्याच वर्षी गोपाळरावांना एक मुलगी झाली, तिचे नाव काशी. या काशीताईला ते फार जपत, कारण तिच्या अगोदर झालेला त्यांचा मुलगा अगदी लहानपणीच वारला होता. ही काशी आणि तिच्यानंतर तीन वर्षांनी झालेली गोदू एवढीच गोखल्यांच्या संसाराची फळे देवाने त्यांना दिली. त्यानंतर त्यांची पत्नी वारली आणि त्यांनी पुनः लग्न न करता अवघ्या पस्तीसवर्षे वयातच संसाराचा संन्यास घेतला. त्यानंतर त्यांनी केवळ देशकार्यातच जीवन घालविले.

देशकार्यासाठी त्यांच्याजवळ अमोघ साधनहोते. त्यांची अभ्यासपूर्ण व तळमळीची सुंदर भाषणे!

इ.स. १८९४ च्या मद्रास येथील काँग्रेस अधिवेशनात गोखले आणि टिळक या जोडीने एकाच विषयावर एकाच विचारांची भाषणे केली, ती ऐकून सर्वांना खूपच आनंद झाला.

इ.स. १८९९ मध्ये गोपाळराव गोखले हे मुंबई प्रांतिक कायदेमंडळात निवडून गेले. तेथील त्यांची महत्त्वाची भाषणे आणि सुधारणांचे कार्य पाहून आगरकर, रानडे वगैरेंना धन्यला वाटली. सत्काराच्या सभेत गोखले म्हणाले,''हे सर्व श्रेय न्या. रानड्यांचे आहे. त्यांनी मला हाताशी धरून मजकडून काम करून घेतले म्हणूनच हा आजचा दिवस दिसत आहे!''


इंग्रजी भाषेवर गोपाळराव गोखल्यांचे दांडगे प्रभुत्व असल्यामुळे लोकहिताचा कोणताही कायदा अथवा मुद्दा सरकारच्या गळी उतरविण्याचा त्यांचा हातखंडा असे. हाती घेतलेल्या विषयांचा ते सखोल अभ्यास करून, सांगोपांग विचार करून अत्यंत मधुरभाषेत पण ठाम निश्चयाने तो विषय ते सरकारदरबारी मांडून देशकल्याण साधीत असत.

हिंदी लोकांतील चमकत्या तेजाची झलक गोखल्यांनी स्पष्ट शब्दात ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांच्यानिदर्शनास आणली आणि त्यांना हिंदी स्वातंत्र्यदानाचा विचार करण्यास भाग पाडले. गोखल्यांची भाषणे आणि त्यांचे कार्य पाहून ब्रिटिश सरकारही चकित झाले आणि हिंदी लोकांना स्वातंत्र्याचे हक्क देणारी १९०९ ची प्रसिद्ध मोर्लोमिंटो सुधारणा पार्लमेंटने मंजूर केली.

स्वतःच्या संसाराकडे दुर्लक्ष करून गोपाळराव गोखल्यांनी हिंदी राष्ट्राच्या संसार उभारणीसाठी अहोरात्र परिश्रम घेतले. हिंदी स्वातंत्र्याच्या कामी त्यांची भाषणे आणि कार्ये यांचा मोठा वाटा आहे, हे सर्वांना पटले.

## ८. देश आणि परदेश

न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज या शिक्षण संस्थांत विद्यार्थ्यांना गणित, इतिहास, इंग्रजी आणि अर्थशास्त्र हे विषय शिकविणारा एक शिक्षक म्हणून गोपाळराव गोखले यांनी आपल्या परोपकारी जीवनाची सुरुवात केली आणि त्या कार्यातच स्वतःच्या राष्ट्रसेवेच्या इच्छेबरोबरच विद्यार्थ्यांना राष्ट्रीयवृत्तीही शिकविली. अभ्यासू, तळमळीचे निष्ठावान शिक्षक म्हणून विद्यार्थी जगात त्यांना विशेष मान मिळाला.



सार्वजनिक सभा, डेक्कन सभा, राष्ट्रीय सभा, मुंबई विद्यापीठ, प्रांतिक कायदेमंडळ, वरिष्ठ मंडळ वगैरे सामाजिक आणे राजकीय

संस्थांमधून त्यांनी लोककल्याणाचे विविध आणि विशेष कार्य केले. त्यावेळी टिळक, आगरकर, रानडे, दादाभाई नौरोजी, सर फेरोज शहा मेथा, कर्वे, बॅनर्जी वगैरे अनेक पुढारी मंडळींशी त्यांचा संबंध आला.

सबंध हिंदुस्थान देशात गोपाळराव गोखले हे एक महान पुढारी म्हणून प्रसिद्धीला आले. त्यांच्या देशसेवेच्या कार्याची कीर्ती देशात आणि परदेशातही पसरली.

गोपाळरावांनी एखादे काम हाती घेतले की त्याचा निकाल ते ठरलेल्या वेळी करीतच. दररोज नियमाने बसून ते काम करीत नसत. पण घेतलेल्या कामांचा सुमार पाहून मग ते काम रात्रीचा दिवस करून उरकण्याची त्यांची पद्धती होती. एखादे वेळी ते रात्री रात्री जागून काम करीत! थोडा थकवा आला की पेपरमिंटची वडी खावी अथवा उठून खोलीत एकदोन फेऱ्या माराव्यात, असा त्यांचा खाक्या असे.

देशांत अथवा परदेशांत कोठेही ते असोत, त्यांच्या अंगीकृत कार्याचा उरक करण्याची पद्धती अशी विलक्षण होती. तल्लख बुद्धिमत्ता, दांडगी स्मरणशक्ती आणि राष्ट्रसेवेची तळमळ यामुळेच त्यांना ती सर्व कामे अशा रीतीने करता येत.



त्यांची बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती पाहून इंग्लंडमधील लोकांनी त्यांची वाहवा केली.

डेक्कन सभेच्या वतीने वेल्बी कमिशन पुढे साक्ष देण्यासाठी त्यांना इंग्लंडात प्रथमच जावे लागले, पण त्यांनी ते काम अत्यंत उत्साहाने करून इंग्लंडातील लोकांकडूनही वाहवा मिळविली. त्यांनी त्या प्रसंगी हिंदुस्थानी जनतेची वकिली उत्तम केली.

हरिभाऊ आपटे आणि गोपाळराव गोखले हे दोघे मित्र एकदा सहज गप्पा मारीत होते. तेव्हा

अ. नं. दि.
२०८६ ३१।३।८

गोपाळराव म्हणाले, "हरिभाऊ, पुढील आयुष्यात तुम्हाला काय व्हावेसे वाटते? " त्यावर हरिभाऊ म्हणाले, "समाजाला मार्गदर्शक असा कादंबरीकार होण्याची मला इच्छा आहे. पण तुम्ही कोण होणार हो, गोपाळराव?"

"मंत्री होऊन देशाची सेवा करावी, ही माझी महत्त्वाकांक्षा आहे!" गोपाळराव म्हणाले. आणि मग खरोखरच त्या मित्रांनी आपल्या ध्येयसिद्धीसाठी पुढे जिवापाड कष्ट करून यश मिळविले. देशात आणि परदेशात त्यांनी


श्री. चिपळूणकर

आपापल्या विभागात उत्तम कीर्ती मिळविली.

त्या काळातील माणसे आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करीत असत आणि मग त्या ध्येयसिद्धीच्या मार्गावर वाटचाल करून सतत कष्ट घेत आणि यश मिळवीत. रानडे, टिळक, आगरकर, गोखले, आपटे, कर्वे, जोशी, दादाभाई नौरोजी, परांजपे वगैरे कितीतरी लोक देशात आणि परदेशात कार्यकरून प्रसिद्ध झाले आहेत. वेल्बी कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी गोखले इंग्लंडला गेले, त्यानंतर अनेक वेळा परदेशात गेले.

"प्रयत्नांती परमेश्वर" अशी त्यांची श्रद्धा होती. श्री गुरू दत्तात्रयाच्या कृपेने आपल्या


दादाभाई नौरोजी

सर्व इच्छा पूर्ण होतील, असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी लिहून ठेवले आहे की, मी योगाभ्यास करीन. इतिहास, तत्त्वज्ञान, ज्योतिष, शास्त्रे, अनेक भाषा यांचा अभ्यास करीन. प्रांतिक व वरिष्ठ मंडळात जाऊन लोकसेवा साधीन. ब्रिटिश पार्लमेंटचा सभासद होऊन मायभूमीचे कल्याण करीन. सर्व जगात मी श्रेष्ठ भारतीय संस्कृतीचा प्रसार करीन."

बाळकोबा नाटेकर यांच्याकडून गोपाळराव गायन शिकू लागले, पण त्यांचा तो व्याख्यान भाषणांचा आवाज गायन कलेस उपयोगी पडेना, म्हणून शेवटी तो प्रयत्न त्यांनी सोडून दिला.

गोपाळराव हे सरकारचे विरोधी पक्षातील निर्भीड टीकाकार होते, तरीही त्यांच्या सखोल व्यासंगाबद्दल आणि निर्लोभी देशभक्तीबद्दल सरकारने त्यांना सी. आय. ई. ही पदवी देऊन त्यांचा थोर गौरव केला.

देशकार्यासाठी त्यांना अनेक वेळा विलायतेच्या सफरी कराव्या लागल्या. त्या सर्व सफरी स्वाभिमानाने आणि सन्मानाने करून त्यांनी देश आणि परदेश यांचा सुंदर संगम साधला.

# १. गोखले आणि गांधीजी

इ.स. १८९६ च्या सुमारास मोहनदास गांधी हे आफ्रिकेतून हिंदुस्थानात आले. त्यावेळी मुंबईपुण्याच्या पुढाऱ्यांना भेटण्यासाठी ते आतुर होते. त्यांनी भेटी घेतल्या आणि आत्मचरित्रात लिहिले, "सरफेरोजशहा मेथा हे मला हिमालयासारखे वाटले, टिळक हे समुद्रासारखे भासले आणि गोपाळराव हे मला गंगोदकासारखे दिसले! हिमालयावर मला चढणे अशक्य. समुद्रात बुडण्याची धास्ती, पण गंगेच्या मांडीवर खुशाल क्रीडा करावी. तिच्यावर होडी खेळवावी त्याप्रमाणे गंगोदकात स्नान करून पावन व्हावे असे मला वाटले.

"गोखल्यांनी माझी बारीक चौकशी केली. विद्यार्थ्याप्रमाणे परीक्षा घेतली आणि कोणा कोणाला भेटावे, कसे भेटावे ते सांगितले!....."

गोपाळरावांबद्दल गांधींना अतिशय प्रेम वाटले. मोकळेपणाने ते त्यांच्या सहवासात राहू लागले. गांधीजींनी गोखल्यांना गुरू मानले. त्यांच्या मवाळ पण निश्चयी धोरणांचा त्यांनी अंगीकार केला.

आफ्रिकेत जे हिंदी बांधव होते त्यांच्या उद्धारासाठी गांधीजींनी तेथे प्रयत्न चालू ठेवले होते. तेथील गोरे सरकार हिंदी लोकांचा द्वेष करीत होते. जुलूम-जबरदस्तीने त्यांना त्रास देत होते. त्या अन्यायापासून हिंदीबांधवांची सुटका व्हावी, त्यांना साधे माणुसकीचे हक्क मिळावेत म्हणून गांधीजींनी अनेक वर्षे तेथे सत्याग्रहाची अहिंसक चळवळ केली.

गांधीजींच्या सेवाकार्याला ना. गोखले यांनी मार्गदर्शन करून यथायोग्य सहाय्य केले. आपल्या गुरूच्या आशीर्वादाने गांधींनी तो लढा नेटाने पुढे चालविला.

आपल्या शिष्याच्या विनंतीवरून १९१२ साली गोपाळराव गोखले स्वतः आफ्रिकेत गेले, यावेळी गोखले यांना हिंदुस्थानात व इंग्लंडतही मोठी मान मान्यता होती. अशा जागतिक पुढाऱ्याची आफ्रिकेत जाण्याची व्यवस्था सरकारने उत्तम केली. आफ्रिकेतील सरकारनेही गोखले यांचे सन्मानाने स्वागत केले.

आफ्रिकेत गांधीजी एका शेतात राहात असत. गोखले तेथे गेले तेव्हा गांधीजींनी त्यांच्यासाठी एक खाट दुसरीकडून मागून आणली. तेथे राहणे गोखल्यांना खूपच गैरसोयीचे होते, तरीही अनेक अडचणी सोसून केवळ शिष्यावरील प्रेमामुळे नामदार गोखले तेथे राहिले. अंगात थंडी भरून आली तरीही त्यांनी खीर-भाकरीचे जेवण केले. ते खाटेवर न झोपता गांधीजींप्रमाणेच जमिनीवर झोपले. चालण्याच्या श्रमामुळे त्यांचे पाय दुखत होते तरीही त्यांनी पायाला मसाज करण्यास गांधींना मनाई केली.

आफ्रिकेतील जनरल स्मट्स आणि जनरल बोथा वगैरे अधिकाऱ्यांना भेटून गोखल्यांनी हिंदी लोकांवरील अन्याय दूर करण्याबद्दल योग्य शब्दांत त्यांची कानउघाडणी केली. त्यांच्या भाषणामुळे आफ्रिकन सरकारने हिंदी लोकांवरील अन्यायी डोईकर रद्द करण्याचे आणि त्यांचा छळ थांबविण्याचे तोंडी आश्वासन दिले. ते तोंडी आश्वासन गांधीजींना पसंत पडले नाही पण



आपल्या गुरूचा सन्मान पाहून गांधीजी धन्य झाले.

गोखल्यांपुढे ते काय बोलणार! गोखल्यांना मात्र संतोष वाटला.

दक्षिण आफ्रिकेतील अनेक शहरांच्या अध्यक्ष, पुढाऱ्यांनी नामदार गोखले यांचे सन्मानाने स्वागत केले. हिंदी लोकांनी त्यांना तेथे अनेक मानपत्रे दिली आणि आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली. आपल्या गुरूचा हा सन्मान पाहून गांधीजींना धन्यता वाटली.

आफ्रिकन सरकारने ना. गोखल्यांना कितीही गोड आश्वासने दिली असली तरी ते सरकार पुनः मूळपदावर येणार आणि हिंदी लोकांना छळणार, यासाठी पुनः सत्याग्रह वगैरेंची चळवळ आपणास करावी लागणार, असे गांधीजी म्हणाले. त्यावर पुढील योजना व कार्य यांची नीट दिशा दाखवून गोखल्यांनी गांधीजींना मार्गदर्शन केले.

गुरूच्या उपदेशाप्रमाणे नंतर गांधीजींनी तेथे पुढील कार्य केले आणि त्या कार्यात त्यांना यशही प्राप्त झाले. गांधीजींचे गुरू गोपाळ कृष्ण गोखले आणि गोखल्यांचे गुरू न्यायमूर्ती रानडे अशा या गुरूशिष्यांच्या जोड्या नवभारताच्या इतिहासात प्रसिद्ध आहेत. राजकारणातील या तीन पिढ्यांचा इतिहास अभ्यसनीय आहे.

❑ ❑ ❑

# १०. राष्ट्रकार्यासाठी प्रवास

ब्रिटिशांच्या राजवटीत हिंदी लोकांमध्ये एक राष्ट्रीय तत्त्वाची भावना निर्माण झाली. तिचा उपयोग राष्ट्रकार्यासाठी करून घेण्यास समाजाला सूत्रबद्ध केले पाहिजे आणि भारताला मानाचे उच्च स्थान मिळवून दिले पाहिजे, त्यासाठी आयुष्यभर राष्ट्रीय कार्यात जीवन वेचणारे निष्ठावान त्यागी आणि सच्चरित्र असे कार्यकर्ते पाहिजेत, हे जाणून गोपाळराव गोखल्यांनी 'भारत सेवक समाज' नावाची एक थोर संस्था स्थापन केली.

समर्थ रामदास, न्यायमूर्ती, हरिभाऊ आपटे वगैरे संतसज्जनांचीही हीच कल्पना होती. तिला मूर्तस्वरूप देऊन भारताची अखंड सेवा करण्यासाठी तशा कार्यकर्त्यांची एक विशेष संघटना म्हणून भारत सेवा समाजाचा जन्म गोपाळरावांनी घडविला त्यांच्या जीवनातील हे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले.

ता.१२ जून १९०५ रोजी या संस्थेची सुरुवात झाली. श्री. गो. कृ. देवधर, श्री. नटेश आप्पाजी द्रवीड, श्री. अनंतराव पटवर्धन असे तीन थोर लोक या समाजाचे पहिले सभासद बनले आणि गोपाळरावांनी तर पुढे याच संस्थेच्या कार्याला वाहून घेतले.

भारतसेवक समाजाचे कार्य आणि त्याचा व्याप सांभाळण्यासाठी गोखल्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. त्या समाजाच्या कचेरीतच त्यांचा



भारतसेवक समाजाच्या कार्यासाठी अहोरात्र परिश्रम

सदैव मुक्काम असे. या संस्थेची कार्यपद्धती पाहून भारतातील अनेक लोक तिचे सभासद झाले.

याच वेळी गोपाळराव गोखल्यांना बनारस येथे काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून लोकांनी मान दिला. पुण्याच्या नगरपालिकेचेही ते अध्यक्ष झाले. या सर्व कामांचा व्याप ते मोठ्या तडफेने निष्ठेने व कुशलतेने सांभाळीत असत.

याच वेळी बंगालची फाळणी आणि व्हॉइसराय लॉर्ड कर्झनचा सुलतानी जुलमी कारभार यामुळे देशात मोठी खळबळ माजली. जनतेचे गाऱ्हाणे पार्लमेंटात आणि ब्रिटिश जनतेला सांगण्यासाठी व त्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी गोपाळराव गोखल्यांना इंग्लंडमध्ये अनेक वेळा जावे लागले. प्रवासाचा त्यांना खूपच त्रास झाला.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागांवर गोऱ्या लोकांबरोबरच हिंदी लोकांनाही नेमले जावे म्हणून हिंदीपुढारी व वरिष्ठ कायदेमंडळातील मंडळींनी पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमले. ती बाजूही प्रभावीपणे मांडण्यास गोखल्यांना इंग्लंडला वारंवार जावे लागले. त्या कामाचा त्यांना खूपच ताण पडला. ❑ ❑ ❑

## ११. ना. गोखले यांचे निधन

इ.स. १९०७ मध्ये गोपाळरावांचे बंधू गोविंदराव वारले. त्यांचे छत्र नाहीसे झाले त्याचवेळी सुरत येथे काँग्रेससभेत खूप भांडणे झाली. जहाल पक्ष आणि मवाळ पक्ष यांच्यात खूपच तेढ आली. ते सारे दुःख त्यांनी सोसले.

या सर्व घटनांमुळे गोपाळरावांची प्रकृती हळूहळू ढासळत चालली. हवापालटासाठी त्यांनी युरोपातील काही देशांत प्रवास केला. दक्षिण आफ्रिकेतही गांधीजींच्या कार्याला प्रत्यक्ष साहाय्य करण्यास त्यांना जावे लागले. अशा दगदगीमुळे त्यांच्या प्रकृतीत एकदम फरक पडत चालला आणि त्यांचे मरण त्यांना जवळ आल्याचे वाटले.

आजारी असतानाच त्यांनी हिंदुस्तानच्या भावी राज्यघटनेचा एक आराखडा तयार करून ठेवला होता. याचवेळी त्यांचे शिष्य गांधीजी त्यांना भेटण्यास आले. पण गोखले फारच थकलेले त्यांना दिसले. गोखल्यांना मूर्च्छाही आली होती. डॉ. देव यांनी त्यांच्यावर उपचार केले.

अंथरुणावर पडल्या पडल्या हरिभाऊ आपटे यांचा हात हातात घेऊन गोपाळराव त्यांना म्हणाले, "बरंय् हरिभाऊ, येतो आता आम्ही!" त्यांनी सर्व मंडळींना नमस्कार केला आणि डोळे मिटले, ते अगदी शांत शांत निजले.

ता. १९ फेब्रुवारी १९१५ यादिवशी गोपाळराव गोखले इहलोक सोडून गेले. भारतमातेचा हा थोर सुपुत्र आपल्या वयाच्या अवघ्या एकोणपन्नास वर्षांच्या अवधीत देशसेवेची महान कार्ये करून निघून गेला.

नामदार गोखले वारल्याची वार्ता हां हां म्हणता सर्वत्र पसरली. सगळीकडे हाहाकार उडाला. त्यांच्या शवयात्रेला सारे पुणे लोटले. सिंहगडाहून टिळक तातडीने आले. श्रद्धांजली अर्पण करताना ते म्हणाले, "हिंदुस्थानातील हिरा, महाराष्ट्रातील नररत्न आणि कर्तृत्वशाली पुरुषांचा वीर आज नाहीसा झाला!" अनेक



भारताचा एक सुपुत्र कायमचा निघून गेला.

लोकांनी गोखल्यांचा गौरव केला.

अनेक प्रकारची राष्ट्रकल्याणाची कार्ये करून भारताचा हा तेजस्वी तारा अस्ताला गेला, याबद्दल देशात आणि परदेशातही सर्व लोकांना हळहळ वाटली. 'भारतसेवक समाज' ही संस्था म्हणजे ना. गोखले यांचे जिवंत स्मारकच आहे. ही त्यांची भारताला एक अमोल देणगीच आहे. तिच्या कार्यामुळे त्यांच्या पवित्र स्मृतीला वारंवार उजळा मिळतो. जगातील जाणत्या लोकांच्या आणि स्वातंत्र्यप्रिय जनतेच्या हृदयात गोखल्यांनी कायमचे स्थान मिळविले. ते अमर झाले!

## १२. हे महाराष्ट्रीय अंतःकरणातून सर्व एक आहेत!

१९१५ साली नामदार गोखले मरण पावले. त्यावेळी सावरकर अंदमानात तुरुंगात शिक्षा भोगत होते. तेथील तुरुंग-अधिकारी बारी हा मोठा क्रूर-कारस्थानी होता. तो राजकीय कैद्यांना मुद्दाम अशा बातम्या सांगे की, ज्यामुळे ते दुःखी, निराश होतील. त्या बातम्या सांगितल्यावर राजकीय कैद्यांच्या प्रतिक्रिया काय होतात, हे तो आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवीत असे.

त्याने ना. गोखले मरण पावल्याची बातमी सावरकरांना सांगितली. त्यावेळी सावरकर संध्याकाळचे जेवण घेत होते. बारी म्हणाला, "सावरकर, तुम्हांला नेहमी काहीतरी बातमी हवी असते न ? ही घ्या बातमी. गोखले वारले."

सावरकरांना प्रथम ती बातमी खरी वाटेना. पण तरी सावरकर हळहळले. ते ऐकून बारी त्यांना मुद्दाम टोचून म्हणाला, "पण ते तुमच्या विरुद्ध होते ना ?'

सावरकर म्हणाले, "छे, छे! मी त्यांच्याच महाविद्यालयात (पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये) शिकलो आहे. मतभेद असेल, पण विरोध नव्हे. ते आमच्या देशातील एक निस्सीम देशभक्त होऊन गेले.

बारी पुन्हा म्हणाला, “पण तुम्हाला पकडल्याशिवाय हिंदुस्थानात शांतता निर्माण होणार नाही, असे ते म्हणाले होते. शिवाय तुम्ही त्यांच्याविरुद्ध भयंकर कट केला होता, असे तुमच्या वरच्या खटल्यात सांगण्यात आले होते. त्याचे काय ?”

या वर सावरकर म्हणाले, “याविषयीच्या दंतकथांवर विश्वास ठेवणे बरोबर नाही. त्यांची आणि माझी अनेकदा गाठभेट होऊन बोलणेही झाले आहे. आम्हां दोघांना परस्परांबद्दल अत्यंत आदर वाटत असे. देशहिताच्या दृष्टीने त्यांना माझा मार्ग कदाचित पसंत नसेल, पण म्हणून त्यांची देशभक्ती जराही कमी ठरत नाही. त्यांनी इंग्लंडमध्ये एकदोनदा आमच्या क्रांतिकारक मार्गाबद्दल विरोधी भाषणे केली होती. त्यामुळे चिडून आमच्या काही लोकांनी त्यांच्यावर आक्रमण करायचे ठरविले होते. पण आमच्या बैठकीत मी ह्या अमंगल विचाराचा तीव्र निषेध केला. आणि प्रामाणिक मतभेदासाठी कुणावरही-विशेषतः आपल्याच लोकांवर-आक्रमण करणे हे घोर पाप आहे, अत्याचार आहे, हे सर्वांना पटवून दिले व त्यांचा निर्णय मी मोडून काढला.’

बारी साहेबाने हा प्रसंग आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवला.

पुढे काही काळाने सावरकरांना ती दैनंदिनी वाचायला मिळाली. त्यात बारी साहेबाने जे लिहिले होते ते वाचून सावरकरांना आश्चर्य वाटले. त्याने लिहिले होते-

“वर वर कितीही भिन्न आणि विरोधी दिसले, तरी हे सारे महाराष्ट्रीय अंतःकरणातून सर्व एक आहेत.’ ❑ ❑ ❑

## १३. यातच खरे मोठेपण आहे!

ना. गोखल्यांच्या निधनानंतर ‘केसरी’ मध्ये लोकमान्य टिळकांनी त्यांचा अत्यंत अर्थपूर्ण असा मृत्युलेख लिहिला. त्यात त्यांचा दीर्घोद्योग, त्यांची सौम्य वृत्ती, त्यांचा निगर्वीपणा वगैरे गुणांची स्तुती करतात. पण मनुष्याचे हे बाह्य गुण आहेत. हे गुण व ही कामगिरी ज्या एका अंतर्गुणामुळे उदयास येते, त्या गुणाबद्दल मतभेद असणे शक्यच नाही, असे आमचे कायमचे मत आहे. तो गुण म्हणजे निर्लोभ अंतःकरणाने वेळीच आपणास देशकार्यास वाहून घेणे, हा होय. बाळपणी अभ्यास व तरुणपणी संसार करून मंदावलेल्या कायिक व मानसिक शक्ती इतर कर्तव्याभावी लोकोपयोगास वाहणारे पुरुष कोठे कोठे आढळून आल्यास विशेष आदरबुद्धी मनात निर्माण होत नाही, पण इंद्रियशक्ती शाबूत आहेत, शरीर स्वार्थासाठी उपयोग करण्यास समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर राहिले आहे आणि संसारातील सुखाचे स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ती होणे साहजिकच आहे. अशा वेळी आणि विशेषकरून या दिशेने गेले असतां आपणास यश मिळण्याचा इतरांपेक्षा काकणभर अधिक संभव आहे, अशा मनास खात्री वाटत असतानाही, या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टी ओढून यथाशक्ती देशकार्यास आपणास वाहून घेणे, त्यात आलेली संकटे सोसण्यास कबूल असणे, किंबहूना त्यातच आनंद

मानून त्यासाठी सतत परिश्रम करण्यास तयार होणे याला एक प्रकारचा बळकट मनोनिग्रह लागत असतो, आणि तो मनोनिग्रह ज्याने दाखविला, दाखविलाच नव्हे तर आमरणान्त कायम ठेवला, तोच पुरुष धन्य होय. ! ......गोपाळरावांचीच आम्ही प्रशंसा करतो यातील बीज हेच होय."

"...... ऐहिक सुखाचा त्याग करणे आणि केवळ देशहितकारक धर्म आचरणे, यातच खरे मोठेवण आहे, आणि हा धर्म ज्याने पाळला तो दुसरे काही करो न करो,..... तो देशकर्त्या पुरूषांच्या वर्गात पडून सद्गती पावतो, असे आम्हांस वाटते." ❑ ❑ ❑

## १४. त्यांचा फोटो टेबलावर ठेवण्यात लाज कसली !

जगन्नाथ महाराज पंडित ऊर्फ बाबा हे लोकमान्य टिळकांच्या मित्राचे चिरंजीव. आपल्या मित्राच्या मृत्यूनंतर मित्राच्या गडगंज संपत्तीचे विश्वस्त म्हणून टिळकांनी डोळ्यांत तेल घालून त्या संपत्तीचे रक्षण केले व ती सर्व संपत्ती जगन्नाथ महाराजांना मिळवून दिली. जगन्नाथ महाराजांना टिळक आपला तिसरा मुलगाच मानीत आणि तेसुद्धा टिळकांना वडिलांप्रमाणेच मानीत. जगन्नाथ महाराज टिळकांच्याच घरी विद्यार्थीदशेत काही दिवस गायकवाड वाड्यात राहात.

एके दिवशी जगन्नाथ महाराज आपल्या खोलीत अभ्यास करीत असताना टिळक सहज त्या खोलीत शिरले. टेबलावर असलेला गोपाळराव गोखल्यांचा फोटो जगन्नाथ महाराजांनी चटकन् उचलून पालथा घातला. टिळकांच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. ते म्हणाले, "गोखल्यांचा फोटो उचलून बाजूला ठेवण्याचे कारण नाही. फोटो जरूर टेबलावर असू दे. तुम्हाला त्यांचा मार्ग पसंत असेल तर त्यांचा आदर्श समोर ठेवल्याने काही बिघडत नाही. तुम्ही आमच्याकडे राहता म्हणजे तुम्ही आमच्याच मार्गाने गेले पाहिजे, असे नाही. गोखले हेदेखील मोठे देशभक्त आहेत. त्यांचे आणि आमचे मार्ग भिन्न आहेत, एवढेच. पण दोघांचे उद्दिष्ट देशाची प्रगती व्हावी, असेच आहेत. तेव्हा त्यांचा फोटो टेबलावर ठेवण्यात लाज वाटण्याचे कारण नाही.

❑ ❑ ❑

## १५. माझ्या गुरूंचे उपरणे

१९१२ सालच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात गोखले ह्यांनी दक्षिण आफ्रिकेला भेट दिली. सर्वत्र हिंडून त्यांनी भारतीयांची स्थिती किती वाईट आहे, हे प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले. अनेक ठिकाणी त्यांची भाषणे झाली. जोहान्सबर्गला त्यांना सर्व भारतीयांनी समारंभपूर्वक मानपत्र अर्पण केले. ह्या मानपत्राचा आकार मुद्दामच माणसाच्या हृदयासारखा ठेवला होता. शिवाय ते सोन्याच्या पत्र्यावर कोरलेले होते.

आफ्रिकेत असेच एका गावी गोखल्यांचे भाषण व्हायचे होते. गोखल्यांची सर्व व्यवस्था गांधीजी जातीने पाहत होते. भाषणाला जाण्याची वेळ आली. गोखले अस्वस्थपणाने काहीतरी शोधीत होते. गांधींनी त्यांना विचारले, "काय शोधता आहात ?"

गोखले म्हणाले, "शोधत नाहीये. पण आता भाषणाला जायचे, तर ह्या उपरण्याला इस्त्री नाही. ते चुरगळलंय्. तसंच ते खांद्यावर घेऊन कसं जायचं ?

गांधीजी म्हणाले, "त्यात काय एवढं! मी देऊ का इस्त्री करून ? मला येते इस्त्री करायला. गोखले म्हणाले, "बाबारे, ते माझ्या गुरूंचे न्या. रानड्यांचे उपरणे आहे. जेव्हा मला कुठे महत्त्वाच्या कामाला जायचे असते तेव्हा मी ते अंगावर घेऊन जातो. तू बरोबर इस्त्री करशील ना? नाहीतर ...."

गोखल्यांची रानड्यांवर म्हणजे आपल्या गुरूंची त्यांच्या गुरूंवर असलेली भक्ती पाहून गांधीजी भारावून गेले. पुढे मग उपरण्याला व्यवस्थित इस्त्री झाल्यावर ते अंगावर घेऊन गोखले सभेला गेले. ❑ ❑ ❑

## १६. तुम्हांला हे पुढे कळेल!

१८९३ साली एका खटल्याच्या निमित्ताने दक्षिण आफ्रिकेत गेले गांधीजी १९१४ साली हिंदुस्थानात परत आले. या एकवीस वर्षांच्या काळात मध्यंतरी ते दोनदा हिंदुस्थानात आले होते. असेच ते १९०१ साली हिंदुस्थानात आले असताना कलकत्त्याला काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. तेथे गांधीजी गेले हाते. काँग्रेसच्या अधिवेशनाला सर्वच मोठे पुढारी आलेले होते. ते सर्वजण मोटारीनेच अधिवेशनाच्या ठिकाणी जमा झाले होते. गांधीजी त्या वेळी काही महात्मा म्हणून हिंदुस्थानात ओळखले जात नव्हते. ते एक सामान्य कार्यकर्ते आहेत, असेच सर्वजण मानत होते. गांधीजी साधेपणाचे भोक्ते. ते मोटारीने न येता घोड्यांच्या ट्रॅममध्ये बसून आले होते. त्यांना आपल्या साधेपणाचे जरा विशेषच कौतुक वाटत होते. म्हणून त्यांनी गोखल्यांना विचारले, "तुम्ही अधिवेशनाच्या जागी कसे आलात ?" गोखले म्हणाले, "मोटारीने!"

त्यावर गांधीजी म्हणाले, "आपण सर्वजण गरीब देशाचे पुढारी, तर आपण साधेपणानेच नको का रहायला? मी बघा ट्रॅमने आलो."

त्यावर ना. गोखले म्हणाले, "तुम्ही अजून लहान आहात. मोठे पुढारी झालात म्हणजे तुम्हाला कळेल, मोठेपणाच्या अडचणी काय असतात ते......

पुढे गांधीजी साऱ्या भारताचे फार मोठे पुढारी झाले. तेव्हा त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाताना आणि ठरलेली वेळ गाठताना काय अडचणी येतात ते कळाले. लोक जयजयकार करतात, दर्शनासाठी रस्ते अडवून ठेवतात, मग पुढे जाणे अशक्यच होऊन बसते. त्यामुळे गांधीजींनाही मुंबईला जायचे असले तर आगगाडीतून बोरीबंदरला न उतरता मध्येच दादरला गुपचूप उतरावे लागे. किंवा पुण्याला यायचे असल्यास खडकीला उतरून दुसऱ्याच वाहनाने यावे लागे. त्यावेळी त्यांना गोखल्यांचे शब्द आठवायचे व मनोमन हसूही यायचे.

# १७. नामदार गोखले यांचे जीवनकार्य

**रानडे यांचे शिष्यत्व :** ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म इ. स. १८६६ मध्ये झाला. शिक्षण संपल्यावर ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले. याच सुमारास न्यायमूर्ती रानडे यांच्याशी त्यांची ओळख झाली. या ओळखीचे पुढे शिष्यत्वांत रूपान्तर झाले. ना. रानड्यांच्या पायाजवळ बसून गोखले यांनी अर्थशास्त्र आणि राजकारण यांचा पायाशुद्ध अभ्यास केला. इंग्रजांच्या मदतीने भारताची उन्नती होईल अशी न्यायमूर्ती रानडे यांची विचारसरणी होती, आणि तीच कल्पना ना. गोखले यांनी आत्मसात केली.

**आदर्श वक्ते :** फर्ग्युसन कॉलेजात ना. गोखले इंग्रजी आणि इतिहास हे विषय शिकवीत. त्यांनी अंकगणिताची पुस्तके लिहिली आहेत. त्यांतही त्यांची बुद्धिमत्ता दिसून येते. निसर्गतःच मिळालेले रुबाबदार शरीर, सौजन्यशील स्वभाव, विषयाचा चौरस अभ्यास, क्लिष्ट विषयही आकर्षक करणारे वक्तृत्व आणि श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारा गोड आवाज या सर्व गुणांनी ना. गोखले यांची कॉलेजातील, कौन्सिलातील आणि व्यासपीठावरील भाषणे अतिशय परिणामकारक होत. इंग्रजी भाषेवर त्यांचे अप्रतिम प्रभुत्व होते.

**लो. टिळक आणि ना. गोखले :** इ. स. १९०२ मध्ये श्री. गोखले कायदेमंडळात गेले. ब्रिटिश समाज्यांत राहून भारताला स्वराज्य मिळावे , हे त्यांचे ध्येय होते. सनदशीर चळवळीने इंग्रजांना आपले म्हणणे पटविल्यास ते स्वराज्य देतील असा त्यांचा विश्वास होता. इ. स. १८९६ मध्ये मिठाचा कर कमी करावा म्हणून काँग्रेसमध्ये आलेल्या ठरावाला अनुमोदन देणारे भाषण ना. गोखले यांनी केले, ते फारच परिणामकारक झाले. त्या वेळी त्यांचे वय अवघे तेवीस वर्षांचे होते. इ. स. १८९६ मध्ये ना. गोखले सेलूबी कमिशनर पुढे साक्ष देण्यासाठी इंग्लंडमध्ये गेले.

**भारतसेवक समाज :** इ. स. १९०५ मध्ये ना. गोखले यांनी भारतसेवक समाजाची (सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी) स्थापन केली. अल्प वेतनावर राहून सारा वेळ, लोकांत राजकीय ज्ञानाचा प्रसार करणे किंवा शास्त्रीय आणि औद्योगिक शिक्षणास मदत करणे, किंवा मागसलेल्यांची उन्नती करणे इत्यादि कामे या समाजाच्या सेवकांनी करावी, अशी योजना ना. गोखले यांनी केली. या भारतसेवक समाजाने ना. शास्त्री सारख्या सुपुत्रांची सेवा भारताला मिळवून दिली आहे.

**अभ्यासपूर्वक भाषण :** ना. गोखले यांची कायदेमंडळातील भाषणे अभ्यासपूर्व केलेली असत आणि म्हणून ती सरकारी अधिकाऱ्यांनाही मार्गदर्शक होत. त्यांनी कर्झनशाहीला विरोध केला, लष्करावरील खर्च कमी करण्यास सांगितले आणि प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याकडे सरकारचे लक्ष वळविले.

वंगभंगाच्या असंतोषाच्या काळात लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत झालेले दडपशाहीचे कायदे योग्य नव्हते, असा सरकारला इशारा केला.

**अन्य कार्य :** इ. स. १९०५ मध्ये नामदार गोखले काँग्रेसचे अध्यक्ष झाले. इतक्या तरुण वयात काँग्रेसचे अध्यक्षपद फारच थोड्यांना मिळाले. काँग्रेसला देशात मोठेपणा येण्यास ज्या थोर गृहस्थांचे श्रम कारणीभूत झाले, त्यांत ना. गोखले हे एक प्रमुख देशभक्त होत. दक्षिण आफ्रिकेत हिंदी मजूर आणि तेथील सरकार यांचा झगडा चालू होता. इ. स. १९१२ मध्ये गोखले यांनी आफ्रिकेत दौरा काढला आणि मजुरांचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले.

**कार्याचा व्याप :** अठराव्या वर्षी बी. ए., विसाव्या वर्षी प्रोफेसर, एकविसाव्या वर्षी सार्वजनिक सभेचे सभासद, एकोणतिसाव्या वर्षी काँग्रेसचे चिटणीस, एकविसाव्या वर्षी रॉयल कमिशनर पुढील प्रमुख साक्षीदार, चौतिसाव्या वर्षी प्रान्तिक व छत्तिसाव्या वर्षी वरिष्ठ कायदेमंडळाचे सभासद आणि एकोणचाळीसाव्या वर्षी काँग्रेसचे अध्यक्ष, अशा विविध जबाबदाऱ्या पेलून व पार पाडून ना. गोखल्यांनी इ. स. १९१५ मध्ये या जगाचा निरोप घेतला. भारत समाज हेच यांचे चिरंतन स्मारक होय.

❑ ❑ ❑

## १८. भारतसेवक समाज

भारताच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आणि जगात भारताला उच्च स्थान प्राप्त करून देण्यासाठी निष्ठावान, त्यागी आणि आपले आयुष्य त्यासाठी वेचणाऱ्या कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे, ही गोष्ट ओळखून गोखल्यांनी 'भारतसेवक समाज,' अशी संस्था काढावी, असा विचार फार दिवसांपासून चालविला होता. न्या. रानड्यांनी 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' नावाचे सुंदर पुस्तक लिहिले होते. त्यांत मराठी सत्ता प्रस्थापित होण्याला महाराष्ट्रीय साधुसंतांचे हात कसे लागले होते, याचे मार्मिक वर्णन केले आहे आणि तसे कार्य करणारा एकमात्र पंथ रामदासीयांचा.

समर्थांचे रामदासी, प्रपंचापासून मुक्त, त्यागी, लोकसेवा करणारे आणि जागरूकपणे सर्वत्र हिंडून लोकस्थितिचे निरीक्षण करणारे असत. त्यांना मानाची, लोभाची वा द्रव्याची अपेक्षाही नसे. महाराष्ट्राच्या पुनरुद्धाराला त्यांचा, मोठ्याच प्रमाणात हात लागलेला होता. ती संघटना गोखल्यांच्या डोळ्यासमोर असावी. रानडे हे त्यांचे गुरू. त्यांनी या संप्रदायाचे गोडवे गायलेले, असे असल्याने त्यांच्यासमोर तोच पंथ असणे अगदी शक्य आहे. तेव्हा देशकार्य करणारे निष्ठावान कार्यकर्ते निर्माण करून त्यांच्याकरवी भारताची अखंड सेवा करणारे लोक एकत्र करावे ही गोखल्यांची कल्पना व त्यांतूनच भारतसेवक समाजाचा जन्म झाला.

या संस्थेच्या कामास १२ जून १९०५ ला सुरुवात झाली. त्यादिवशी भारतसेवक समाजाच्या इमारतीच्या पायाचा दगड गोखल्यांचे एक मित्र श्री. शिवराम हरि साठे यांच्या हस्ते बसविण्यात आला आणि फर्ग्युसन

कॉलेजच्या मागील टेकडीवर पहिले भारत सेवक म्हणून गोपाळ कृष्ण देवधर, नटेश आप्पाजी द्रवीड व अनंत विनायक पटवर्धन यांना सभासदत्वाची शपथ देण्यात आली. त्यावेळी सोसायटीपुढे राजकीय ध्येय म्हणजे केवळ साम्राज्यान्तर्गत वसाहतीचे स्वराज्य, एवढेच होते.

आणि ही गोष्ट साध्य होण्यासाठी पराकाष्ठेचा त्याग करावा लागेल, त्यासाठी चारित्र्यवान कार्यकर्ते पाहिजे, त्यांना दीर्घकाळ झगडले पाहिजे, ही गोष्ट ना. गोखले यांनी स्पष्ट केली.

नामदार गोखले यांनी सर्व्हंट्स ऑसोसायटीचा जाहीरनामा लिहिला. त्यातील प्रत्येक शब्द, प्रत्येक वाक्य हे इतके विशुद्ध राष्ट्रप्रेमाने भरलेले आहे की, कोणाही देशभक्ताने ते करावे. तो तयार करीत असताना त्यांनी आपले जणू हृदयाच त्यांत ओतले होते. राष्ट्रसेवा हाच आपला धर्म समजा, धर्मकर्म ज्या निष्ठेने करता त्या बुद्धीने राष्ट्रकार्य करा, असे त्यांनी आग्रहाने सांगितले.

भारत सेवा समाजाच्या सभासदाने पुढील गोष्टी करावयाच्या, असे ठरविण्यात आले.

१. आपल्या स्वतःच्या आचरणाने लोकांत देशप्रेम उत्पन्न करणे व त्यासाठी जो पडेल तो त्याग करण्याची शिकवण देणे.

२. लोकांना राजकीय शिक्षण देऊन, प्रचार करून लोकमत संघटित करणे.

३. निरनिराळ्या जातींतील विरोध नाहीसा करून परस्परांत प्रेमभावना आणि सलोखा निर्माण करणे.

४. मागासलेल्या जातींत शिक्षणप्रसार करणे, औद्योगिक शिक्षणासाठी संघटित प्रयत्न करणे.

५. अस्पृश्यांची सर्वांगीण सुधारणा करणे.

भारत सेवक समाजाच्या सभासदाला खाली शपथ घ्यावी लागतेः

(१) देशहिताचे चिंतन हीच गोष्ट सदैव माझ्या डोळ्यांपुढे राहील. माझ्यापाशी जे काही उत्कृष्ट आहे ते मी देशसेवेला अर्पण करीन.

(२) देशसेवा मी स्वार्थनिरपेक्ष करीन.

(३) भारतातील सारे लोक माझे बंधू या भावनेने मी वागेन. जात व पंथ यांचा विचार न करता मी सर्वांच्या उन्नतीसाठी सारखाच झटेन.

(४) माझ्या व माझ्या कुटुंबियांच्यनिर्वाहासाठी संस्था जे देईल त्यात मला संतोष आहे, त्यापेक्षा जास्त पैसा मिळविण्याचा प्रयत्न मी करणार नाही.

(५) मी आपले खासगी आचरण शुद्ध ठेवीन.

(६) मी कोणाबरोबर खासगी व्यक्तिगत भांडणे करणार नाही.

(७) संस्थेचे ध्येय ठेवून मी सतत प्रयत्न करीन, संस्थेच्या ध्येयाला बाधक असे मी काही करणार नाही.

संस्था स्थापन झाल्यावर प्रचारकांसाठी त्यांनी शिक्षणक्रमही आखला. पांच वर्षेपर्यंत विद्यार्थ्यांने सर्व राजकीय वा सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करून मग चळवळीच्या आखाड्यात प्रत्यक्ष उतरावे, असे ठरविण्यात आले.

देशात कसलीही आपत्ती आली तर ती निवारण्यासाठी सोसायटी अग्रभागी असते. मग ते यात्रेचे ठिकाण असो, जलप्रलयाने अगर भूकंपाने निराधार झालेल्यांचे दुःख-निवारण

असे, दुष्काळ असो वा साथीचा रोग असो. सोसायटीचे सदस्य संस्थापकांच्या हेतूप्रमाणे पोटतिडकेने काम करीत असताना आढळतील. सोसायटीचे पहिले अध्यक्ष ना. गो. कृ. गोखले, त्यांच्यानंतर श्री. श्रीनिवासशास्त्री, नंतर पंडित हृदयनाथ कुंझरू हे अध्यक्ष होते. संस्थेचे उत्कृष्ट ग्रंथालय आणि सर्व सुखसोयीनी युक्त अशी इमारत आहे. शिवाय मुंबई, नागपूर, प्रयाग, मद्रास अशा ठिकाणी सोसायटीच्या शाखा होत्या.

ना. गोखले हे कित्येक वर्षे वरिष्ठ कायदेमंडळाचे एक प्रमुख व लोकनियुक्त सभासद होते. सोसायटी स्थापन झाल्यानंतर त्यांनी संस्थेसाठी द्रव्यनिधि जमविण्यास सुरुवात केली. सोसायटीला प्रारंभी चांगली मदत झाली व तिचा विनियोग योग्य कारणीच झाला. ही संस्था हेच गोखल्यांचे चालतेबोलते चिरंजीव स्मारक होय. ना. गोखले यांनी आपले सारे आयुष्य भारत सेवक समाजासाठी खर्च केले. त्यांच्यानंतर सातारचे प्रसिद्ध वकील रावबा. काळे यांनी मोठा निधी संस्थेला दिला. भारतसेवक समाज हे नामदार गोखले यांचे जिवंत स्मारकच आहे.

❑❑❑

## १९. नामदार गोखले यांची वचने

(१) राष्ट्राची लष्करी सुरक्षितता हा निःसंशय सर्वप्रथम विचाराचा विषय असा आहे की, ज्यापुढे बाकी सर्व विचार बाजूस सारले पाहिजे.

(२) अज्ञानी आणि अक्षरशत्रू राष्ट्र कसल्याही तऱ्हेची भरीव प्रगती कधीच करू शकणार नाही.

(३) विश्वासानेच विश्वास निर्माण होईल आणि लोकांच्या राजनिष्ठेवर धीटपणे विश्वास ठेवण्यानेच राष्ट्रनिष्ठेला प्रत्यक्ष परिश्रमास प्रवृत्त करता येईल.

(४) वृत्तपत्रसृष्टीने आमच्या राष्ट्रव्यापक विवेकाला स्फूर्ती दिली आहे.

(५) बहुजन-समाजाला शहाणे करून सोडल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राचा ऐहिक असासामाजिक अगर अर्थसंपन्न विकास होणे शक्यच नाही.

(६) लोककल्याणाचे विश्वासू पहारेकरी म्हणजे वृत्तपत्रे.

(७) अनुत्पादक कर्ज हे खरेखुरे कर्ज ठरत असते.

(८) "सध्या आपणास आपल्या देशासाठी अनेक बाजूंनी अहर्निश झटले पाहिजे. उज्ज्वल देशभक्तीने प्रेरित होऊन जर आपण आपल्या देशास सर्वांगसुंदर बनविण्यासाठी झटू तर हल्लीची लाजिरवाणी स्थिती फार दिवस टिकावयाची नाही, हे उघड आहे.

आज जिकडे नजर फेकावी तिकडे कामाचा डोंगर पडलेला आहे. तो उचलण्यास हजारो सुशिक्षितांनी आपले जन्म खर्ची घातले पाहिजेत. आपणांवर प्रचंड जबाबदारी आहे असे वाटून त्यांस स्फुरण आले पाहिजे. जो क्षण देशकार्याशिवाय इतर उद्योगात गेला तो फुकट गेला. अशी मनास तळमळ लागली पाहिजे.

❑❑❑

## २०. ना. गोखले यांचे अंकगणित

इ.स. १८८६-८७ मध्ये गोपाळराव गोखले यांनी अंकगणिताचे एक पुस्तक तयार केले. ते लिहून पूर्ण झाल्यावर त्यांनी त्या काळच्या गणित पंडितांना ते हस्तलिखित दाखविले. टिळक हे गणितज्ज्ञ होते. त्यांना गोखल्यांचे ते अंकगणित खूपच आवडले. ते म्हणाले,"हे पुस्तक छापा! शाळांमधून याचा फार उपयोग होईल!"

रहाळकर आणि मंडळींनी प्रथम ते पुस्तक छापले, नंतर मॅकमिलन कंपनीने त्या पुस्तकाचा सबंध हिंदुस्थानभर प्रसार केला. लेखक गोखले यांना प्रकाशकाकडून दरमहा सव्वाशे रुपये मिळू लागले. हा मोबदला गोखल्यांना तर हयातभर मिळालाच, पण त्यांच्यानंतर त्यांच्या मुलीला (सौ. काशीताई ढवळेंना) सुद्धा मिळाला.

"गोखले अंकगणित" हे फारच उपयुक्त आणि प्रसिद्ध पुस्तक ठरले. याच्या पंचवीस-तीस आवृत्त्या निघाल्या. प्रो. नाईक यांनी या पुस्तकाची आवृत्ती सुधारली आणि पुनः या गणिताची खूप प्रसिद्धी वाढली.

❐❐❐

## २१. ना. गोखले यांच्याबद्दल थोरांचे बोल

१) सर फेरोजशहा मेथा, मुंबई ता. ५/३/१९१५ "विद्यार्थिदशेत असल्यापासून मनापुढे उच्च ध्येय बुद्धिमान पुरुषास काय करता येणे शक्य आहे, याचा धडा गोपाळरावजींच्या चरित्रावरून पुढल्या पिढीने घ्यावा." असे त्यांस आमचे सांगणे आहे व तो ते घेतील, अशी आम्हांस उमेद आहे."

२) लो. टिळक केसरी लेख ता.२३/२/१९१५, "गोपाळराव गेल्यामुळे देशापुढे जी अनेक कामे पडली आहेत ती रेटण्यास मला आता अगदी एकटे एकटे वाटत आहे."

३) मुंबई कॉंग्रेसच्या वार्षिक सभेत १९१५-"गोखले यांचे आमच्या घराण्याशी शिष्यत्वाचे नाते होते. १९०१ मध्ये देशावर जी आपत्ती गुदरली त्यावेळी गोखले पुढे आले आणि त्यांनी देशाला नवा प्रकाश दिला. गोखल्यांचे कीर्तिरूप तेज वाढत गेले. या सच्छिष्याने आपल्या गुरूंची जागा भरून काढली."

❐❐❐

## २२. ना. गोखले यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| ९ मे १८६६ | : जन्म (कोतळूक, जि. रत्नागिरी) |
| १८७९ | : पिता कृष्णराव यांचा मृत्यू |
| १८८० | : प्रथम विवाह |
| १८८१ | : मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १८८४ | : बी. ए. पास. |
| १८८५ | : न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शि |
| १८८७ | : द्वितीय विवाह |
| १८९१ | : प्रथम पत्नी-निधन |
| १८९६ | : गांधींची प्रथम भेट |
| १८९७ | : विलायतेचा प्रवास |
| १९०० | : द्वितीय पत्नीचे निधन |
| १९०५ | : भारतसेवक समाजाची स्थापना |
| | : दक्षिण आफ्रिकेचा प्रवास |
| १५ | : इहलोकातून प्रयाण |

BVBK-04 12946


श्री गणपतीच्या गोष्टी
श्रीकृष्णाच्या गोष्टी
श्री देवीच्या गोष्टी
श्री पांडुरंगाच्या गोष्टी
श्रीरामाच्या गोष्टी
श्री खंडोबाच्या गोष्टी
बालगोपाल
-किशोरकिशोरींकरिता
थोर संत -महात्म्यांच्या
संस्कारक्षम बोधात्मक
श्री संत तुकाराम
श्री संत ज्ञानेश्वर
श्री नवनाथांच्या गोष्टी
सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.